March-2016

(L) FYBMM (M) Eff. Com. Skills-II

OP3ADX

वेळ — २ तास ३० मि. गुण — ७५

सुचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
(२) उजवीकडील संख्या गुण दर्शवितात.
(३) योग्य ठिकाणी उदाहरणे द्या.

---

**प्र.१ पुढील उताऱ्याचे संपादन करून पुर्नलेखन करा. (१५)**
**(व्याकरण, शुद्धलेखन इ.संदर्भाने)**

नाठय संमेलनाचा औचित साधून दरवर्शी नाट क्षेत्रातील समस्यवर चर्चा होते आनि प्रश्नांचे सोडवणुकीसाठी सरकारकडून आसवासनही मिळत असते. पुढे वर्षबर या क्षेत्राशी संबंधिथ कलावंत आणि सरकार यांच्यात भेटी सोडा साधा संवाधही होताना दिसत नाही. हा संवाध प्रसथापित करून नाटयसूष्टीचे प्रश्न सोडविण्यासाठी ठोस उपाय आकले जातील, असे आश्वासन देत मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संमेलना च्या निमित्ताने होत असलेल्या राजकीय घोषनाबाजीवर रविवारी अप्रत्यक्षपणे बोट ठेवले.

मुख्य मंत्रां च्या उपस्थितीत ठाण्यात तीन दिवसां पासून सुरू असलेल्या नाटय संमेलनाचा रवीवारी समारोप झाला. या वेळी केंद्रीय अवजड उद्योग मंत्री अनंत गीते, विधान परिशदेचे उपसभापती वसंत डावखरे, खासदार सजय राऊत, स्वागताध्यक्ष आणि पालकमंत्री एकनाथ शिंदे, मुखय आयोजक राजन विचारे उपस्थित होते. समारोपाच्या मान्यवरांमध्ये नाव असूनही राष्ट्रवादी काग्रेसचे अध्यक्ष शरद पवार अनुपस्थित होते. नाटय संमेलनाच्या निमित्ताने या क्षेत्राशी संबंधित अनेक प्रश्न, मागन्या माडल्या जातात

**प्र.२ पुढील उताऱ्याचे १/३ स्वरूपात साराश लेखन करा. (१५)**

ठाण्यात आयोजित करण्यात आलेले संमेलन हे भव्यदिव्य झाले असून येथील रसिकांना उद्या सुनेसुने वाटल्याशिवाय राहणार नाही. ठाण्याच्या या नाटय संमेलन म्हणजे जणू त्यांचे स्मारक आहे. त्यामुळे त्यांच्या वेंगळया स्मारकांनी गरजच भासणार नाही, असे प्रतिपादन नाटय संमेलनाचे अध्यक्ष गंगाराम गवाणकर यांनी व्यक्त केले. आज जर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी आपल्या मावळयांनी उभारलेल्या या संमेलनाचे नक्कीच कौतुक केले असते. त्यामुळे त्यांच्या दुसऱ्या स्मारकाची गरजच पडली नसती, असेही ते या वेळी म्हणाले.

मुख्यमंत्र्यांची उपस्थिती असल्याने अध्यक्षांनी आपल्या काही मागण्या त्यांच्यासमोर ठेवल्या. त्यामध्ये चित्रकलेप्रमाणे बालरंगभूमीचे शिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देण्याची मागणी या वेळी करण्यात आली.

OP3ADX

नाटयशास्त्र विषय शिकवण्यासाठी रंगकर्मींचा उपयोग करून घ्यावा, असेही त्यांनी सुचविले. महाराष्ट्रात ५५ वर्षांपासून घेतल्या जाणाऱ्या राज्य नाटय स्पर्धेसाठी लागणारी मदत नाटय परिषदेच्या माध्यमातून घ्यावी. तसेच आमदार आणि खासदारांनी आयपीएलप्रमाणे ठिकठिकाणी स्पर्धा घेऊन नाटकांनी निवड करावी. निवडक नाटकांना दत्तक घेऊन राज्यातील विविध भागांमाध्ये त्यांचे सादरीकरण करावे, असे ते म्हणाले. याशिवाय नव्या उड्डाणपुलाखाली उपलब्ध करून दिल्यास त्यांची वाहने, साहित्य ठेवण्यासाठी योग्य जागा उपलब्ध होऊ शकेल.

**प्र.३ अ) पुढील नकाशावर भाष्य करा.** **(८)**

~~ISOPLETH~~

भारत - तापमान (जुलै महिना)




**ब) तुमच्या परिसरातील भीषण पाणीटंचाईची तक्रार करणारे पत्र वृत्तपत्रातून प्रसिद्ध होण्यासाठी सपादकांना लिहा.** **(७)**

OP3ADX

प्र.४ अ) तुमच्या महाविदयालयात आयोजित करण्यात आलेल्या ''भारतीय चित्रपट : काल आज व उदया'' या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेची बातमी तयार करा. (८)

ब) तुमच्या महाविदयालयातील खालील पैकी कोणत्याही एका आयोजनाचा वृत्तांत तयार करा. (७)

क) गंधर्व महोत्सव

ख) डॉ. वा. ना. बेडेंकर राज्यस्तरीय आंतर महाविदयालयीन वादविवाद स्पर्धा

प्र.५ पुढील प्रश्नाचे उत्तर हिंदी/इंग्रजी मध्ये लिहा.

अ) वृत्तपत्रासाठी मोबाईल फोनची जाहिरात तयार करा.
(हिंदी किंवा इंग्रजी भाषेत) (८)

ब) वृत्तपत्रासाठी जीवन विमा योजनेची जाहिरात तयार करा.
(हिंदी किंवा इंग्रजी भाषेत) (७)